ePaper

# नारायण राणेंनी मला फुकट धमक्या देऊ नयेत: मनोज जरांगे




| वर्ष - 8 | अंक - 31 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 5 ऑगस्ट 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत

- श्रीलंकेचा ३२ धावांनी दणदणीत विजय!
- जोकोव्हिचची सुवर्णपदकाला गवसणी
- ॥ श्रावण मासी हर्ष मानसी ॥
- बांगलादेशमध्ये पुन्हा हिंसाचार


## राजकीय श्रेय नव्हे, प्रकल्प मार्गी लागल्याचे समाधान

# श्रेय 'रोडमॅन' गडकरी साहेबांचे!

## नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर : खासदार, आमदारांची भूमिका 'नो पॉलिटिक्स'

। पिंपरी । अधिकराव दिवे-पाटील । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड आणि चाकण औद्योगिक पट्ट्याला जोडणारा बहुप्रतिक्षित नाशिक फाटा ते खेड ८ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पाला केंद्रीय मंत्रीमंडळात मंजुरी मिळाली. शिरुर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील आणि भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांनी या प्रकल्पावरुन 'नो पॉलिटिक्स' अशी भूमिका घेतल्याचे दिसते.**



ग्राऊंड रिपोर्ट




## 'टाक काडी अन् लाव आग'

**दरम्यान, नाशिक फाटा ते खेड या आठ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर प्रकल्पावरुन 'राजकीय वनवा' पेटवण्याचा प्रयत्न करणाऱ्या अल्पसंतुष्टांना आजी-माजी खासदार व आमदारांनी चपराक दिली आहे. एखादा चांगला प्रकल्प होत असेल, तर त्यामुळे श्रेयाची लढाई न करता लोकहितासाठी पक्षीय मतभेद बाजुला ठेवून एकत्रित पाठपुरावा केला पाहिजे, असा संदेश दिला आहे. त्यामुळे 'टाक काडी अन् लाव आग' वाल्या कथित 'राजकीय कावळ्यांचा' पुरता भ्रमनिरास झाला आहे.**

तब्बल ७ हजार ८२७ कोटी रुपयांच्या 'बिग बजेट' प्रकल्पावरुन श्रेयवादाचा भडका व्हावा आणि आपला राजकीय स्वार्थ साधावा, या मानसिकतेतून 'विष पेरणी'चा प्रयत्न समाजमाध्यमांमधून केला जातो आहे. या निमित्ताने 'महाईन्यूज' ने आजी-माजी खासदार, आमदार यांच्याशी संपर्क केला आणि भूमिका जाणून घेतली आहे.

केंद्रीय मंत्रीमंडळाच्या दि. २ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या बैठकीत देशातील ९३६ किलोमीटर अंतराच्या आठ मार्गांना मंजुरी देण्यात आली. त्यासाठी ५० हजार ६५५ कोटी रुपये खर्च होणार आहे. यामध्ये पिंपरी-चिंचवड शहरातून जाणाऱ्या नाशिक फाटा ते खेड या आठ पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर ३० किलोमीटर अंतराच्या मार्गाचा समावेश आहे. त्यामुळे शहरातील तळवडे-चिखली-मोशी- भोसरी परिसरातील "ट्रॅफिक कोंडी" कायमची सुटणार आहे. आता हा प्रकल्प भाजपाप्रणित केंद्र सरकार आणि केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्यामाध्यमातून मार्गी लागणार आहे, असे असले तरी पाठपुरावा कोणी केला? आणि श्रेय कुणाचे ? यावरुन राजकीय वातावरण तापवण्याचा प्रयत्न केला जात आहे. वास्तविक, शिरुर लोकसभा आणि दोन विधानसभा मतदार संघातून जाणाऱ्या या मार्गासाठी त्या-त्या लोकप्रतिनिधीने आपआपल्या पातळीवर पाठपुरावा केला आहे. शिरुरचे माजी खासदार म्हणून शिवाजीराव आढळराव पाटील यांनी, तर विद्यमान खासदार म्हणून डॉ. अमोल कोल्हे यांनी पाठपुरावा केला आहे. राज्य व केंद्रातील सत्ताधारी पक्षाचे आमदार म्हणून महेश लांडगे यांनीही या प्रकलपासाठी सभागृहात भूमिका मांडली, ही वस्तुस्थिती आहे.

***"सदर प्रकल्पाचे श्रेय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आहे. प्रकल्प होतो आहे, ही बाब महत्त्वाची आहे" अशी भूमिका घेत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी राजकीय प्रगल्भता दाखवली आहे किंबहुना या प्रकल्पावर श्रेयवाद निर्माण करणाऱ्यांचे अप्रत्यक्ष कान टोचले आहेत.***

२०११ मध्ये चाकण एमआयडीसीमधील उद्योजकांच्या शिष्टमंडळासमवेत झालेल्या बैठकीत नाशिक फाटा ते खेड दरम्यान महामार्गावरील वाढत्या वाहतूक कोंडीचा विचार करुन हा रस्ता सहापदरी करावा, अशी मागणी केंद्र सरकारकडे केली होती. त्याप्रमाणे २०१६ मध्ये केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रकल्प अहवालास मंजुरी दिली होती. २०१७ मध्ये निविदा प्रक्रिया राबवली. मात्र, महानगरपालिका हद्दीतील आराखड्यामध्ये बदल सुचवल्यामुळे काम सुरू झाले नाही. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने हा प्रकल्प मार्गी लागतोय, ही समाधानाची बाब आहे, अशी भूमिका माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी घेतली आहे.



"आठवडाभरापूर्वी गडकरी साहेबांची या प्रकल्पाबाबत भेट घेतली होती. त्यावेळी त्यांनी आश्वस्त केले होते. पूर्वी निविदा प्रक्रिया सुरू झालेली असतानाही केंद्रीय मंत्रीमंडळाच्या मान्यतेबाबत यामध्ये अट घातली होती. या प्रकल्पबाबात सर्व श्रेय गडकरी साहेबांचे आहे. डीपीआर, टेंडर प्रोसेस सर्व बाबी प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे या प्रकल्पाचे काम लवकर पूर्ण होईल. यासाठी मी स्वत: योग्य तो पाठपुरावा करणार आहे.

**-डॉ. अमोल कोल्हे,** खासदार, शिरुर लोकसभा.



"चाकण औद्योगिक पट्ट्यातील उद्योजकांसोबत अनेकदा बैठका झाल्या. उद्योजकांच्या अगदी PMO पर्यंत तक्रारी गेल्या. २०१६ मध्ये गडकरी साहेबांनी 'डीपीआर'ला मंजुरी दिली. २०१७ मध्ये निविदा काढण्यात आली. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने या प्रकल्पामध्ये मेट्रो समाविष्ट करण्याचा मुद्दा पुढे केला. तांत्रिक कारणामुळे टेंडर थांबले. उद्योजकांनी अगदी PMO पर्यंत तक्रारी गेल्या. अनेक वर्षांच्या प्रतिक्षेनंतर नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने हा प्रकल्प मार्गी लागत आहे.

**-शिवाजीराव आढळराव पाटील,** माजी खासदार, शिरुर लोकसभा.



"केंद्र आणि राज्यात भारतीय जनता पार्टी महायुतीचे सरकार आहे. माझ्या मतदार संघातून नाशिक फाटा ते खेड राष्ट्रीय महामार्ग जातो. त्यामुळे मी माझ्या परीने राज्य व केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पिंपरी-चिंचवडकरांसाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या या प्रकल्पासाठी सकारात्मक निर्णय घेतला. त्यामुळे मी केंद्र सरकारचे शहरवासीयांच्या वतीने आभार मानले आहेत. श्रेयासाठी नव्हे, तर लोकहिताच्या प्रकल्पासाठी एकत्रितपणे सर्वांनी आपआपल्या परीने पाठपुरावा केला आहे.

**-महेश लांडगे, आमदार,** भोसरी विधानसभा.

# पुण्यात पुन्हा पुराचे सावट!

## लष्कराच्या 100 जवानांची तुकडी तैनात

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील संततधार पाऊस आणि खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आल्याने भारतीय सैन्य दलाची तुकडी एकतानगर येथे मदत कार्यात तैनात करण्यात आली आहे.**





जिल्हाधिकारी कार्यालयाने भारतीय लष्कराच्या सहाय्याची मागणी केल्यानंतर तातडीने लष्कराची तुकडी मदतकार्यात सहभागी झाली. पूरग्रस्त भागात तैनात केलेल्या या तुकडीत सुमारे १०० जवानांचा समावेश आहे. या तुकडीमध्ये मराठा लाईट इन्फंट्रीच्या पायदळातील जवान, बॉम्बे इंजिनिअर्स ग्रुपचे अभियंता कार्य दल आणि खडकीच्या लष्करी रुग्णालयातील वैद्यकीय पथकाचा समावेश आहे. ही तुकडी, बचाव नौका, मानवरहीत स्वयंचलित हेलिकॉप्टर्स (क्वाडकॉप्टर) आणि इतर आवश्यक बचावसाधनांनी सुसज्ज आहे. बचावतुकडीच्या प्रमुखांनी (कमांडर) परिस्थितीचा नागरी प्रशासनासोबत प्राथमिक आढावा घेतला. खडकवासला धरणातून पाण्याचा वाढीव विसर्ग सुरू केल्याने एकता नगरसह अनेक भागात पाण्याच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. नागरी प्रशासनाच्या सहकार्याने, भारतीय लष्कराच्या या तुकडीने जलमय भागातील सर्व इमारती आणि घरे रिकामी करण्यास सुरुवात केली असून, रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केले जात आहे.पूरग्रस्त भागाचा परिणामकारक आढावा घेऊन प्रभावी उपाययोजना करण्यासाठी क्वाडकॉप्टर आणि फुगवता येण्याजोग्या रबरी नौकांच्या सहाय्याने टेहळणी करण्यात येत आहे. सुरु असलेल्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, द्वारका अपार्टमेंटमधून, काही अडकलेल्या लोकांची यशस्वीरित्या सुटका करण्यात आली. रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी मोठ्या प्रमाणात पाणी साचलेल्या निवासी इमारतींमध्ये आपत्कालीन निर्गमन व्यवस्थाही तैनात करण्यात आली आहे. आवश्यकतेनुसार मदत करण्यासाठी अतिरिक्त राखीव मदत तुकड्याही सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाने भारतीय लष्कराच्या सहाय्याची मागणी केल्यानंतर तातडीने लष्कराची तुकडी मदतकार्यात सहभागी झाली. पूरग्रस्त भागात तैनात केलेल्या या तुकडीत सुमारे १०० जवानांचा समावेश आहे. या तुकडीमध्ये मराठा लाईट इन्फंट्रीच्या पायदळातील जवान, बॉम्बे इंजिनिअर्स ग्रुपचे अभियंता कार्य दल आणि खडकीच्या लष्करी रुग्णालयातील वैद्यकीय पथकाचा समावेश आहे. ही तुकडी, बचाव नौका, मानवरहीत स्वयंचलित हेलिकॉप्टर्स आणि इतर आवश्यक बचावसाधनांनी सुसज्ज आहे. बचावतुकडीच्या प्रमुखांनीपरिस्थितीचा नागरी प्रशासनासोबत प्राथमिक आढावा घेतला.

### धरणातून पाण्याचा वाढीव विसर्ग सुरु

खडकवासला धरणातून पाण्याचा वाढीव विसर्ग सुरू केल्याने एकता नगरसह अनेक भागात पाण्याच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे.नागरी प्रशासनाच्या सहकार्याने, भारतीय लष्कराच्या या तुकडीने जलमय भागातील सर्व इमारती आणि घरे रिकामी करण्यास सुरुवात केली असून, रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केले जात आहे.पूरग्रस्त भागाचा परिणामकारक आढावा घेऊन प्रभावी उपाययोजना करण्यासाठी क्वाडकॉप्टर आणि फुगवता येण्याजोग्या रबरी नौकांच्या सहाय्याने टेहळणी करण्यात येत आहे.

# मग हा वादा लोकसभेला कुठं गेला होता?

## कार्यकर्त्यांच्या घोषणांवर अजित पवारांची मिश्किल टीप्पणी

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित पवार हे आपल्या विधानांमुळे नेहमीच चर्चेत असतात, कधी ते त्यांच्या खास शैलीत एखाद्याला रागावतात, तर कधी आपल्या मिश्किल स्वभावाने उपस्थितांना हसायला भाग पडतात. अजित पवारांच्या अशाच एका मिश्किल विधानाची सध्या चर्चा सुरु आहे.**



### राजकीय संकृती जपायला हवी

राजकारण्यांना ढेकणं वगैरे म्हटलं जात आहे. ही नावं बघून मलाच आश्चर्य वाटतं. मात्र, मी ठरवलं आहे. आपण आपली महाराष्ट्राची राजकीय संकृती जपायला हवी. यशवंतराव चव्हाणांनी आपल्याला जी शिकवण दिली, त्यांच्या विचारांवरच आम्ही काम करतो आहे. अजित पवार हे आपल्या विधानांमुळे नेहमीच चर्चेत असतात, कधी ते त्यांच्या खास शैलीत एखाद्याला रागावतात, तर कधी आपल्या मिश्किल स्वभावाने उपस्थितांना हसायला भाग पडतात. अजित पवारांच्या अशाच एका मिश्किल विधानाची सध्या चर्चा सुरु आहे. बारामतीतील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे विधान केलं आहे. बारामतीत आज अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षरोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

बारामतीतील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे विधान केलं आहे.बारामतीत आज अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षरोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अजित पवारही उपस्थित होते. अजित पवार यावेळी भाषण करण्यासाठी व्यासपीठावर येताच काही उत्साही कार्यकर्त्यांनी 'एकच वादा अजित दादा' अशी घोषणाबाजी सुरू केली. अजित पवार यांनी त्या कार्यकर्त्यांना शांत राहण्यास सांगितले. मात्र, त्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी सुरुच ठेवली. त्यानंतर अजित पवारांनी हा वादा लोकसभेला कुठं गेला होता, अशी मिश्किल टीप्पणी केली. यावेळी उपस्थितांमध्ये जोरदार हशा पिकला.पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, "मी यंदाच्या अंतरिम अर्थसंकल्पात काही योजना सुरू केल्या आहेत. मात्र, विरोधक हा चुनावी जुमला असल्याचे म्हणत आहेत. मुळात प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार आहे. पण राज्यातील काही राजकीय नेते आजकाल काहीही बोलत आहेत.

## नदीकाठच्या 1 हजारांहून अधिक नागरिकांचे निवारा केंद्रांमध्ये स्थलांतर

# पिंपरी-चिंचवडमध्ये आपत्कालीन यंत्रणा सज्ज!

## आयुक्त शेखर सिंह यांची माहिती, अधिकाऱ्यांनी केली सखल भागाची पाहणी

। पिंपरी।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अतिवृष्टीमुळे व धरणातून सातत्याने होणाऱ्या विसर्गामुळे शहरातून वाहणाऱ्या नद्यांच्या पाणीपातळीत सातत्याने वाढ होत आहे. अशा परिस्थितीत नदीकाठच्या रहिवाशांना सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करावे, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिका प्रशासनाला दिले. शहरातील विविध ठिकाणच्या जवळपास १ हजार नागरिकांना आज दुपारी १२ वाजेपर्यंत निवारा केंद्रात स्थलांतरित करण्यात आले असून या संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. संभाव्य आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी तसेच मदत व बचावकार्यासाठी एनडीआरएफचे पथक शहरात दाखल झाले असून बॉम्बे इंजिनीअरिंग ग्रुप, औंध ब्रिगेड या यंत्रणांना देखील सज्ज ठेवण्यात आले असल्याची माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.**



आज आयुक्त शेखर सिंह यांच्यासह अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी यांनी सखल भागाची पाहणी केली. यामध्ये मुख्यत्वे सुभाषनगर घाट, संजय गांधी नगर तसेच पिंपळेगुरव व सांगवी भागातील परिसराचा समावेश होता. यावेळी स्थानिक नागरिकांनी सुरक्षित स्थळी स्थलांतरित होण्याबाबत तसेच विविध स्वयंसेवी संस्थांनी देखील याकामी महापालिका प्रशासनास सहकार्य करण्याबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी आवाहन केले. तसेच पोलीस यंत्रणा आणि महापालिका आपत्कालीन यंत्रणा यांनी समन्वयाने परिस्थिती हाताळावी असे निर्देश देखील त्यांनी यावेळी दिले.

सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रात यंत्रणा सज्ज ठेवून आवश्यक ठिकाणी तात्काळ प्रतिसाद पथके पाठवून परिस्थिती हाताळावी. निवारा केंद्रात असलेल्या पुरबाधितांना भोजनासह आवश्यक सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात. तसेच वैद्यकीय पथकाने आपले पथक कार्यरत ठेवून निवारा केंद्रातील नागरिकांची वेळोवेळी आरोग्य तपासणी करावी, असे निर्देश आयुक्त सिंह यांनी दिले आहेत. काल शनिवार ३ ऑगस्ट रोजी रात्री उशीरा बोपखेल येथील सुमारे १०० नागरिकांना मनपा शाळेतील निवारा केंद्रामध्ये तर रिव्हर रेसिडेन्सीजवळील महापालिकेच्या एसटीपी प्रकल्पातील लेबर कॅम्पमध्ये पाणी घुसल्याने ८० जणांना भोसरी येथे सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्यात आले आहे. तसेच जुनी सांगवी येथील अहिल्यादेवी होळकर शाळेमध्ये ४० नागरिकांना स्थलांतरित करण्यात आले आहे.

### नागरिकांनी दक्षता बाळगावी

नदीकाठी वास्तव्य करणाऱ्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून धोकादायक स्थळांच्या ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्यांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत करण्यात आले असून तेथे भोजनासह आवश्यक सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिला असून नागरिकांनी दक्षता बाळगावी आणि आवश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे. तसेच नदीच्या पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता असून नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पवना धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस

## धरणातून 7070 क्युसेक्सने विसर्ग सुरू; नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा


। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या २४ तासात पवना धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस झाला आहे. धरण सध्या ९३ टक्के भरले असून आज आणखी पाऊस होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्याच अनुषंगाने आज (दि.०४) सकाळी दहा वाजल्यापासून धरणातून ७०७० क्युसेक्सने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. दरम्यान नदीकाठच्या सर्व नागरिकांना प्रशासनाच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.**



पवना धरण सद्यस्थितीत ९३ टक्के भरलेले असून धरणाच्या सांडव्यावरून ३६०० क्युसेक्स तर जलविद्युत केंद्रामधून विद्युतगृहाद्वारे १४०० क्युसेक्स असा एकुण ५००० क्युसेक्स इतक्या क्षमतेने नदीपात्रात विसर्ग चालू आहे. पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात शपावसाचा जोर वाढलेला असल्याने पाणीसाठा नियंत्रित करणेकरिता आज (दि.०४) सकाळी १० वाजता सांडव्यावरून विसर्ग वाढवून ५६७० क्युसेक्स करण्यात येणार आहे. तरी नदी पात्रामध्ये एकुण ७०७० क्युसेक्स (५६७०+१४००= ७०७० क्युसेक्स) इतक्या क्षमतेने विसर्ग होणार आहे. पाणलोट क्षेत्रात होणा-या पावसाच्या प्रमाणानुसार व येव्यानुसार धरणातून नदीपात्रात होणारा विसर्ग पुन्हा कमी/जास्त करण्यात येईल.

तरी पवना नदी काठच्या सर्व नागरीकांना सूचित करण्यात येते की कृपया नदीपात्रात कोणीही उतरू नये. तसेच नदी मधील पाण्याचे पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत असे आवाहन पवना धरण पूरनियंत्रण कक्षाच्या वतीने करण्यात आले आहे.



### मोरया गोसावी मंदिर पुन्हा पाण्यात..

पिंपरी चिंचवडकरांचे ग्रामदैवत असलेले मोरया गोसावी गणपती मंदिर पुन्हा एकदा पाण्याखाली जात आहे. पवना धरणातून पवना नदी पात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग होत असल्यामुळे पवना नदी दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे पवना नदीचे पाणी आज मोरया गोसावी गणपती मंदिरात शिरले आहे. पवना धरण सध्या ९४ टक्के भरले असून दुपारी साडेबारा वाजता ८९६० क्युसेक्सने पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. अतिवृष्टीमुळे पवना धरण पात्रात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला आहे. त्यामुळे पवना धरण पूर्णपणे भरले असून नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. पवना धरणातून पाण्याचा विसर्ग आणखी वाढल्यास मोरया गोसावी मंदिर पुन्हा एकदा पाण्याखाली जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

# क्रांतिकारक निकालाचे आव्हानात्मक वास्तव



भूमिका

**अजूनही अतिमागासलेला राहिलेल्या घटकाला काहीसे झुकते माप दिले पाहिजे, या अर्थाने सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे स्वागत केले पाहिजे. पण हे वर्गीकरण जात हा घटक मानून केले जाणार की, अनुसूचित समाविष्ट असलेल्या सर्वच जातींतर्गत केले जाणार आहे, हा कळीचा प्रश्न आहे.**

आरक्षणाच्या लाभापासून आजही कोसो दूर असलेल्या देशातील अनुसूचित जातींमधील अतिमागासांना घटनात्मक न्याय मिळावा, यासाठी मागासलेल्या जातींमध्येच वर्गीकरण करण्यास मान्यता देणारा सर्वात मोठा आणि क्रांतिकारक असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. अतिमागास, तसेच ज्यांना आरक्षणाचा लाभ अजून मिळेला नाही, त्यांना या वर्गीकरणातून किंवा उपवर्गीकरणातून स्वतंत्र आरक्षण देण्यासंबंधीचा हा निकाल आहे.आता हा विषय या देशातील हजारो वर्षे सामाजिक अवहेलना, अत्याचार सहन केलेल्या, सहन करीत असलेल्या पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य मानल्या गेलेल्या अनुसूचित जातीअंतर्गत उपवर्गीकरणापर्यंत येऊन थांबला आहे. काही राज्यांतील सरकारांनी या निकालाचे स्वागत केले आहे. महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगेचच सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी



राज्यात स्वतंत्र आयोग स्थापन करण्याची घोषणा केली आहे. देशात घटनात्मक आरक्षण धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली, त्याला सात दशकांचा कालावधी होऊन गेला. तरीही मागासलेल्या समाजांचे सर्वव्यापी मागासलेपण अजूनही गेलेले नाही, हे या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. त्यामुळे मागासांमधील अतिमागास घटकांना पुढे आणण्यासाठी वेगळी किंवा विशेष तरतूद करण्याची आवश्यकता आहे, ते कुणीही नाकारणार नाही. भारतीय संविधानातील सामाजिक न्यायाचे तत्त्व हेच निर्देशित करते. अमेरिकन लेखक-विचारवंत जॉन रॉल्स यांनी न्यायाचा सिद्धांत (थिअरी ऑफ जस्टिस) मांडला आहे. समान संधी मिळूनही एखादा वर्ग उपेक्षित राहात असेल तर, त्याला थोडे झुकते माप देणे न्याय्य ठरेल, असे त्यांनी आपल्या न्याय सिद्धांतात म्हटले आहे. या अर्थाने सर्वोच्च न्यायालयाचे या निकालाचे स्वागत आणि समर्थन करायला हवे. परंतु या निकालाच्या निमित्ताने सामाजिक आणि विशेषत: राजकीय क्षेत्रात जी चर्चा सुरू झाली आहे, त्यामुळे या न्यायालयीन निकालाचा आपण अर्थ कसा घेतो, त्याचा अन्वयार्थ कसा लावतो, हे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. ही चर्चा सामाजिक भेगा अधिक रुंदावणारी आहे, असे खेदाने म्हणावे लागते. न्यायालयाच्या निर्णयाकडे सकारात्मकतेने न बघता, अनुसूचित जातींमध्येच कलहाची बिजे टाकली जात आहेत, हे चिंताजनक आहे. मागासांमधील काहींची म्हणजे १०-१५ टक्के समाजाची आरक्षणाच्या माध्यमातून प्रगती झाली असेल तर, त्यामुळे इतर जाती मागास राहिल्या, असाही चर्चेचा सूर आहे आणि तो द्वेषमूलक आहे. मुळात सरकारी नोकऱ्यांचे आणि आरक्षणाच्या अंमलबजावणीचे वास्तव काय आहे आणि ज्यांना वर्गीकरणाची घाई झाली आहे, त्या सत्ताधारी राजकीय पक्षांची आरक्षणाबाबतची नेमकी काय भूमिका आहे, हेही समजून घेतले पाहिजे.सर्वोच्च न्यायालयाचा हा निकाल केवळ अनुसूचित जातींसाठी असल्यामुळे त्यांच्याबद्दलच विचार करूया. केंद्रीय पातळीवरील नोकऱ्यांमध्ये अनुसूचित जातींसाठी १५ टक्के आणि महाराष्ट्रात सरकारी-निमसरकारी नोकऱ्यांमध्ये १३ टक्के आरक्षण आहे. १५ टक्क्यांमध्ये ११०० च्या वर जाती आहेत, महाराष्ट्रात या जातींची संख्या ५९ आहे. वरील टक्केवारीच्या आधारे पाहता देशात २० कोटीहून अधिक तसेच महाराष्ट्रात दीड कोटींच्या आसपास अनुसूचित जातींची लोकसंख्या आहे, असे ढोबळमानाने म्हणता येईल. एवढ्या मोठ्या लोकसंख्येसाठी सरकारी नोकऱ्यांची किती उपलब्धता आहे आणि जी उपलब्धता आहे, त्या जागा तरी प्रामाणिकपणे भरल्या जातात का? आता तर सरकारी नोकऱ्यांचे खासगीकरण व कंत्राटीकरण सुरू आहे. वित्त मंत्रालयाच्या सार्वजनिक उपक्रम विभागाचा २०२३ चा अहवाल काय सांगतो ते पाहणे उचित ठरेल. २०१३ मध्ये केंद्र सरकारमध्ये ४७ लाख नोकऱ्या होत्या.

## प्रासंगिक »

### शिंदे हाजीर हो!

***विरोधी पक्ष सशक्त असेल तर काय होऊ शकतं याची प्रचीती गेल्या आठवड्यामध्ये पत्रकारांना आली.***

लोकसभा सचिवालयाने संसदेच्या आवारात उभा केलेल्या मोठ्या कंटेनरमध्ये वृत्तवाहिन्यांच्या पत्रकारांना डांबून ठेवल्याचं प्रकरण खूप गाजलं. कंटेनरच्या पिंजऱ्यात अडकून पडावं लागल्यानं पत्रकारांनी निषेध केला. गेल्या दहा वर्षांत वृत्तवाहिन्यांच्या पत्रकारांनी केलेला हा पहिलाच निषेध असेल. प्रेस क्लब वगैरे पत्रकारांच्या संघटना वेगवेगळ्या घटनांचा निषेध करत असतात. पण, सत्ताधारी भाजप त्यांच्याकडं फार लक्ष देत नाही. या निषेधाचं वृत्तवाहिन्यांच्या पत्रकारांनाही फारसं घेणदेणं नसतं. कारण अनेक पत्रकारांना भाजप हा देशाचा तारणकर्ता असल्याचा भास होत असतो. याच मंडळींना सत्ताधाऱ्यांनी संसदेच्या आवारात इंगा दाखवला. निषेधाचं खरं कारण हेच म्हणावं लागेल. आम्ही इतकी वर्षं भाजपच्या आवडीच्या बातम्या दिल्या आणि आता हेच आम्हाला पिंजऱ्यात कोंडून घालत आहेत. ज्याच्यावर विश्वास ठेवला त्यानंच घात करावा अशी अवस्था झाली होती. मग, पत्रकारांना निषेध करण्याशिवाय पर्यायच उरला नाही!

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी २३ जुलै २०२४ रोजी २०२४-२५ चा अर्थसंकल्प सादर केला. दुसऱ्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांत अर्थसंकल्पावर चर्चा सुरू झाली. अर्थमंत्र्यांनी ३० जुलै रोजी लोकसभेत आणि ३१ जुलै रोजी राज्यसभेत झालेल्या चर्चेला ‘उत्तर’ दिले.

# अर्थमंत्री बोलतात, पण ऐकतात का?

अर्थमंत्र्यांच्या मते हा खर्च हा सुशासनाचाच एक भाग आहे. परिणामी, ‘विकास’ आणि ‘कल्याण’चा समाजातील सर्व घटकांना फायदा होतो. अर्थमंत्र्यांनी त्यांच्या युक्तिवादाला आकड्यांची जोड दिली आहे. २०१३-१४ मध्ये म्हणजे यूपीए सरकारच्या शेवटच्या वर्षात किती खर्च केला गेला; २०१९-२० आणि २०२३-२४ मध्ये म्हणजे एनडीए सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या आणि शेवटच्या वर्षांत किती खर्च केला गेला; आणि २०२४-२५ मध्ये किती खर्च केला जाणार आहे. या आकडेवारीमध्ये दर वर्षागणिक वाढ होणे हे नैसर्गिकच आहे. उदाहरणार्थ, अर्थमंत्री म्हणाल्या, “२०१३-१४ मध्ये फक्त ०.३० लाख कोटी रुपये कृषी आणि संलग्न क्षेत्रासाठी वाटप करण्यात आले होते, तर आता या क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एवढेच नाही तर २०२३-२४ या मागील वर्षाच्या तुलनेत ती आठ हजार कोटी रुपयांनी जास्त आहे. गेल्या काही वर्षांत आम्ही त्यात कोणतीही कपात केलेली नाही, तर वाढच केली आहे.”



पण वस्तुस्थिती अशी आहे की, हे आकडे स्थिर किमतींमध्ये नाही तर वर्तमान किमतींमध्ये होते. शिवाय, वाढीव खर्च एकूण खर्चाच्या प्रमाणात किंवा सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या प्रमाणात असेल तेव्हाच तो दावा ग्राह्य धरता येईल.अर्थमंत्री म्हणाल्या की, सरकारचे धोरण हे सक्षम, स्वतंत्र आणि समर्थ होते. त्यासाठी त्यांनी सगळ्यांना माहीत असलेली आकडेवारीच परत मांडली. पीरियॉडिक लेबर फोर्स सर्व्हेचा दावा आहे की बेरोजगारी ३.२ टक्क्यांवर घसरली आहे. स्टेट बँकेच्या संशोधन अहवालात असे आढळून आले की, २०२४ ते २०२३ दरम्यान १२५ दशलक्ष नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत. हे दोन्ही अहवाल सरकारी आहेत. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमीच्या अंदाजानुसार सध्या बेरोजगारीचा दर ९.२ टक्के आहे. म्हणजे सरकारच्या आणि या आकडेवारीत विरोधाभास आहे. इंडियन लेबर फोर्सच्या अहवालात भारतातील एकूण बेरोजगारांमध्ये ८३ टक्के तरुण असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे काही शे किंवा काही हजार नोकऱ्यांसाठी हजारो- लाखो उमेदवार का येतात, या प्रश्नाचे उत्तर अर्थमंत्री देतील का? उदाहरणार्थ,बेरोजगारी एवढ्या मोठ्या प्रमाणात घटली असेल, तर नोकरी आणि ती मिळवण्यासाठी येणारे उमेदवार यांचे गुणोत्तर इतके विषम का? वरील दोन घटनांमध्ये, हे गुणोत्तर १:८० आणि १:३२९ होते. अभियंते, व्यवस्थापनशास्त्रातले पदवीधर, वकील आणि पदव्युत्तर पदवीधर हे हवालदार किंवा कारकुनाच्या नोकरीसाठी अर्ज का करत होते? बेरोजगारीबद्दल वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी पंतप्रधान आणि इतर मंत्र्यांनी देशातील शहराशहरांमध्ये, गावागावांमध्ये तिथल्या रस्त्यावर फिरावे असे मी सुचवेन. गमतीत सांगायचे तर अर्थमंत्र्यांनी जिथे त्यांचा जन्म झाल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कोण कुणाला ढेकूण म्हणत आहेत!

## ठाकरे-फडणवीस वादावर अजित पवार काय म्हणाले?

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उद्धव ठाकरेंनी पुण्यातल्या सभेत देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख टरबूज असा केला. तसंच मी आता अमित शाह यांना अहमदशाह अब्दाली असं म्हणणार असंही उद्धव ठाकरे म्हणाले. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांना उत्तर दिलं. देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख उद्धव ठाकरेंनी ढेकूण असाही केला होता. ठाकरे-फडणवीस वादावर आता अजित पवारांनीभाष्य केलं आहे. बारामतीतल्या सांगवी या ठिकाणी अजित पवार बोलत होते.**



आता लढाई मैदानात आहे, मी मुंबईत म्हणालो की एक तर मी तर राहीन किंवा तू तरी राहशील. इथे एक पोस्टर लागलंय. त्यातील फोटोत माझ्या पायाशी एक कलिंगड ठेवलंय. काहींना वाटलं की मी त्याला आव्हान दिलेय. पण, ढेकणांना आवाहन द्यायचं नसतं तर बोटाने चिरडायचं असतं. मी आव्हान द्यावं इतका मोठा तू नाहीस. काहीजणांना वाटलं की मी त्याला आवाहन दिलेय. तर हे आव्हान चोर-दरोडेखोरांच्या पक्षाला आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी नाव न घेता भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका केली होती. उद्धव ठाकरेंच्या डोक्यावरचा ताबा सुटला आहे. ते अत्यंत निराशेत आहेत. त्या निराशेतून ते ज्या प्रकारचे शब्द वापरत आहेत त्यावर आपण काय उत्तर द्यायचं? फर्स्टेशनमध्ये जो माणूस डोकं बिघडल्यासारखा बोलतो त्याला उत्तर द्यायचं नव्हतं. मात्र भाषण करुन उद्धव ठाकरेंनी दाखवून दिलं जे अमित शाह म्हणाले होते. अमित शाह त्यांच्याबद्दल म्हणाले होते की ते औरंगजेब फॅन क्लबचेच सदस्य आहेत. उद्धव ठाकरेंनी भाषण करुन ते दाखवून दिलं. असं उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी दिलं होतं.मी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर निघालो आहे. मी फक्त विकासाच्या मुद्द्यावर बोलणार आहे. फाफटपसारा सांगणार नाही, पण आता कोण कुणाला ढेकूण म्हणत आहेत.

एकमेकांचे कपडे काढायचं बाकी ठेवतात. सत्ताधारी आणि विरोधकांनी लक्ष घालण्याची गरज आहे. पाच ते सहा वेळा एफआरपी वाढला पण MSP वाढला नाही. ४० रुपयापर्यंत साखरेचे दर करून द्या, अशी मागणी आम्ही केली आहे. वाढवणजवळ आम्ही विमानतळ करणार आहेत. असं अजित पवार त्यांच्या भाषणात म्हणाले. त्यांनी उद्धव ठाकरेंना लक्ष्य केलं आहे. आता लढाई मैदानात आहे, मी मुंबईत म्हणालो की एक तर मी तर राहीन किंवा तू तरी राहशील. इथे एक पोस्टर लागलंय. त्यातील फोटोत माझ्या पायाशी एक कलिंगड ठेवलंय.

काहींना वाटलं की मी त्याला आव्हान दिलेय. पण, ढेकणांना आवाहन द्यायचं नसतं तर बोटाने चिरडायचं असतं. मी आव्हान द्यावं इतका मोठा तू नाहीस. काहीजणांना वाटलं की मी त्याला आवाहन दिलेय. तर हे आव्हान चोर-दरोडेखोरांच्या पक्षाला आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी नाव न घेता भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका केली होती.

उद्धव ठाकरेंनी पुण्यातल्या सभेत देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख टरबूज असा केला. तसंच मी आता अमित शाह यांना अहमदशाह अब्दाली असं म्हणणार असंही उद्धव ठाकरे म्हणाले. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांना उत्तर दिलं. देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख उद्धव ठाकरेंनी ढेकूण असाही केला होता.

ठाकरे-फडणवीस वादावर आता अजित पवारांनीभाष्य केलं आहे. बारामतीतल्या सांगवी या ठिकाणी अजित पवार बोलत होते.आता लढाई मैदानात आहे, मी मुंबईत म्हणालो की एक तर मी तर राहीन किंवा तू तरी राहशील. इथे एक पोस्टर लागलंय. त्यातील फोटोत माझ्या पायाशी एक कलिंगड ठेवलंय. काहींना वाटलं की मी त्याला आव्हान दिलेय. पण, ढेकणांना आवाहन द्यायचं नसतं तर बोटाने चिरडायचं असतं. मी आव्हान द्यावं इतका मोठा तू नाहीस.

काहीजणांना वाटलं की मी त्याला आवाहन दिलेय. तर हे आव्हान चोर-दरोडेखोरांच्या पक्षाला आहे, अशा शब्दांत उद्धव ठाकरेंनी नाव न घेता भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका केली होती.

### ठाकरेंच्या डोक्यावरचा ताबा सुटला

उद्धव ठाकरेंच्या डोक्यावरचा ताबा सुटला आहे. ते अत्यंत निराशेत आहेत. त्या निराशेतून ते ज्या प्रकारचे शब्द वापरत आहेत त्यावर आपण काय उत्तर द्यायचं? फर्स्टेशनमध्ये जो माणूस डोकं बिघडल्यासारखा बोलतो त्याला उत्तर द्यायचं नव्हतं. मात्र भाषण करुन उद्धव ठाकरेंनी दाखवून दिलं जे अमित शाह म्हणाले होते. अमित शाह त्यांच्याबद्दल म्हणाले होते की ते औरंगजेब फॅन क्लबचेच सदस्य आहेत. उद्धव ठाकरेंनी पुण्यातल्या सभेत देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख टरबूज असा केला.

# चांदीवाल आयोगाचा अहवाल मविआच्या काळातच आला

## देवेंद्र फडणवीसांचं अनिल देशमुखांना प्रत्युत्तर

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उद्धव ठाकरेंविरोधात खोटी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी देवेंद्र फडणवीसांनी आपल्यावर दबाव आणला, असा आरोप काही दिवसांपूर्वी अनिल देशमुख यांनी केला होता. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनीही त्यांना प्रत्युत्तर दिलं होतं. तेव्हापासून देवेंद्र फडणवीस आणि अनिल देशमुख यांच्या कलगीतुरा रंगला आहे. दोन्ही नेते एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत.**



चांदीवाल आयोगाच्या अहवालाची प्रत दाखवत पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांना लक्ष केलं. खुनाच्या गुन्हातील अरोपीच्या कुबड्यावर देवेंद्र फडणवीस यांना माझ्यावर आरोप करण्याची वेळ आली, अशी टीका त्यांनी केली. तसेच महायुती सरकार हा अहवाल प्रसिद्ध करत नसल्याचा आरोपही त्यांनी केला. या आरोपालाच चांदीवाल आयोगाचा अहवाल महाविकास आघाडीच्या काळात आला होता. मग तो अहवाल प्रसिद्ध का गेला नाही? याचं उत्तर आधी त्यांनी द्यावं. मुळात परवमीर सिंह यांना महाविकास आघाडीने आयुक्त केलं होतं. अनिल देशमुख हे गृहमंत्री असताना त्यांनी आरोप केले होते. खरं तर विरोधी पक्षाच्या सांगण्यावरून एखादा पोलीस आयुक्त गृहमंत्र्यांवर आरोप कसे करेल? त्यामुळे या सगळ्या कपोलकल्पित गोष्टी आहेत. यात काहीही अर्थ नाही, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. अनिल देशमुखांवर गुन्हा दाखल करण्यासाठी उच्च न्यायालयाने आदेश दिले होते. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या सांगण्यावरूनच हे प्रकरण सीबीआयकडे हस्तांतर करण्यात आलं होतं. यात केंद्र सरकारचा काहीही संबंध नव्हता. त्यावेळी न्यायालयाने जे आदेश दिले, ते बघितले तर या सर्व गोष्टी स्पष्ट होतील, असंही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. तसेच रोज अशाप्रकारे कुणी येऊन बोलत असेल तर त्यांच्या स्तरावर जाऊन या प्रकरणावर बोलायची माझी इच्छा नाही. पण शेवटी सत्य सर्वांना माहिती आहे. सत्य जनतेसमोर आलं आहे.

### काय म्हणाले देवेंद्र फडणवीस?

पुढे बोलताना, अनिल देशमुखांवर गुन्हा दाखल करण्यासाठी उच्च न्यायालयाने आदेश दिले होते. त्यानंतर उच्च न्यायालयाच्या सांगण्यावरूनच हे प्रकरण सीबीआयकडे हस्तांतर करण्यात आलं होतं. यात केंद्र सरकारचा काहीही संबंध नव्हता. त्यावेळी न्यायालयाने जे आदेश दिले, ते बघितले तर या सर्व गोष्टी स्पष्ट होतील, असंही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. तसेच रोज अशाप्रकारे कुणी येऊन बोलत असेल तर त्यांच्या स्तरावर जाऊन या प्रकरणावर बोलायची माझी इच्छा नाही. पण शेवटी सत्य सर्वांना माहिती आहे. सत्य जनतेसमोर आलं आहे.

# ओवैसींचा मोदी सरकारवर हल्लाबोल!

## सरकार बोर्डाची मालमत्ता हिसकावण्याचा प्रयत्न करत आहे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रातील मोदी सरकार आता वक्फ कायद्यात सुधारणा करण्याच्या तयारीत आहे. या सुधारणांचे विधेयक पुढील आठवड्यात संसदेत मांडलं जाण्याची शक्यता आहे. महत्त्वाचे म्हणजे केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत या सुधारणांना मंजूरी मिळाल्याचंदेखील सांगितलं जात आहे. दरम्यान, यावरूनच आता विविध राजकीय प्रतिक्रियादेखील उमटू लागल्या आहेत. एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनीही यावरून मोदी सरकारवर जोरदार टीकास्र सोडलं आहे.**





असदुद्दीन औवैसी यांनी यासंदर्भात आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी केंद्रातील मोदी सरकारवर गंभीर आरोप केले. भाजपा सुरुवातीपासूनच वक्फ बोर्डच्या विरोधात आहे. या कायद्यात सुधारणा करून केंद्र सरकार वक्फ बोर्डाची मालमत्ता हिसकावण्याचा प्रयत्न करत आहे. हा एकप्रकारे आमच्या धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकारावरचा हल्ला आहे. भारतीय संविधानाने प्रत्येकाला धार्मिक स्वांत्र्याचा अधिकार दिला आहे. खरं तर आरएसएसचा सुरुवातीपासूनच वक्फ बोर्डाची मालमत्ता बळकावण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे ते म्हणाले.इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, केंद्र सरकार वक्फ बोर्ड कायद्यात एकूण ४० करण्याच्या तयारीत आहे. या सुधारणांना मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरीदेखील मिळाली आहे. या सुधारणांचे विधेयक पुढील आठवड्यात संसदेत मांडलं जाण्याची शक्यता आहे.अल्लाह आणि इस्लामच्या नावावर धर्मादाय हेतूने दान केलेली संपत्ती म्हणजे 'वक्फ' होय. कायदेशीर भाषेत सांगायचे झाल्यास, इस्लामचे पालन करणाऱ्या व्यक्तीकडून कायमस्वरूपी दान केलेली मालमत्ता म्हणजे वक्फ होय. मग ही मालमत्ता स्थावर आणि जंगम अशा दोन्ही स्वरुपाची असू शकते. मुस्लिमांसाठी पवित्र, धार्मिक किंवा धर्मादाय ठरत असलेल्या कोणत्याही परोपकारी कारणासाठी ही संपत्ती दान केलेली असू शकते. ही मालमत्ता चांगल्या कामासाठी समाजाची मालमत्ता म्हणून ओळखली जाते आणि अल्लाहशिवाय कुणीही त्या मालमत्तेचे मालक असत नाही आणि होऊही शकत नाही, असे मानले जाते. एखाद्या मालमत्तेचा दीर्घ कालावधीसाठी धार्मिक किंवा धर्मादाय हेतूंसाठी वापर केला जात असल्यास ती वक्फ मानली जाऊ शकते. या मालमत्तेचा वापर सामान्यत: शैक्षणिक संस्था, स्मशानभूमी, मशिदी आणि निवारा गृहे चालवण्यासाठी केला जातो. वक्फसाठी मालमत्ता देणाऱ्या व्यक्तीला आपली मालमत्ता परत घेता येत नाही. कायद्याने त्या मालमत्तेला कायम वक्फची मालमत्ता म्हणूनच संरक्षण मिळते. बिगरमुस्लीम व्यक्तीदेखील वक्फची मालमत्ता तयार करू शकतो. मात्र, त्या व्यक्तीने इस्लामचा पुरस्कार केला पाहिजे आणि वक्फ तयार करण्याचे तिचे उद्दिष्ट हे इस्लामिक मूल्यांशी संलग्न असले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने जानेवारी १९९८ मध्ये दिलेल्या आपल्या एका निर्णयामध्ये असे म्हटले होते की, "एकदा वक्फला दान केलेली मालमत्ता ही कायमस्वरुपी वक्फच्याच ताब्यात राहते."असदुद्दीन औवैसी यांनी यासंदर्भात आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी केंद्रातील मोदी सरकारवर गंभीर आरोप केले. भाजपा सुरुवातीपासूनच वक्फ बोर्डच्या विरोधात आहे. या कायद्यात सुधारणा करून केंद्र सरकार वक्फ बोर्डाची मालमत्ता हिसकावण्याचा प्रयत्न करत आहे. हा एकप्रकारे आमच्या धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकारावरचा हल्ला आहे. भारतीय संविधानाने प्रत्येकाला धार्मिक स्वांत्र्याचा अधिकार दिला आहे. खरं तर आरएसएसचा सुरुवातीपासूनच वक्फ बोर्डाची मालमत्ता बळकावण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे ते म्हणाले.इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, केंद्र सरकार वक्फ बोर्ड कायद्यात एकूण ४० करण्याच्या तयारीत आहे. या सुधारणांना मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरीदेखील मिळाली आहे.अल्लाह आणि इस्लामच्या नावावर धर्मादाय हेतूने दान केलेली संपत्ती म्हणजे 'वक्फ' होय. कायदेशीर भाषेत सांगायचे झाल्यास, इस्लामचे पालन करणाऱ्या व्यक्तीकडून कायमस्वरूपी दान केलेली मालमत्ता म्हणजे वक्फ होय.

### आपली मालमत्ता परत घेता येत नाही

मग ही मालमत्ता स्थावर आणि जंगम अशा दोन्ही स्वरुपाची असू शकते. मुस्लिमांसाठी पवित्र, धार्मिक किंवा धर्मादाय ठरत असलेल्या कोणत्याही परोपकारी कारणासाठी ही संपत्ती दान केलेली असू शकते. ही मालमत्ता चांगल्या कामासाठी समाजाची मालमत्ता म्हणून ओळखली जाते आणि अल्लाहशिवाय कुणीही त्या मालमत्तेचे मालक असत नाही आणि होऊही शकत नाही, असे मानले जाते. एखाद्या मालमत्तेचा दीर्घ कालावधीसाठी धार्मिक किंवा धर्मादाय हेतूंसाठी वापर केला जात असल्यास ती वक्फ मानली जाऊ शकते. या मालमत्तेचा वापर सामान्यत: शैक्षणिक संस्था, स्मशानभूमी, मशिदी आणि निवारा गृहे चालवण्यासाठी केला जातो. वक्फसाठी मालमत्ता देणाऱ्या व्यक्तीला आपली मालमत्ता परत घेता येत नाही.

# बांगलादेशमध्ये पुन्हा हिंसाचार; ९१ जणांचा मृत्यू

## बांगलादेशमध्ये सरकारकडून अनिश्चित काळासाठी संचारबंदी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बांगलादेशमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उफाळून आला आहे. या हिंसक घटनेत ९१ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १०० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. या घटनेनंतर बांगलादेशमध्ये अनिश्चित काळासाठी कर्फ्यू लावण्यात आला असून इंटरनेटदेखील बंद करण्यात आले आहे.**



महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारनेही या घटनेनंतर बांगलादेशमधील भारतीय नागरिकांनी सुरक्षित स्थळी राहण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच येथील भारतीय नागरिकांसाठी हेल्पलाईन नंबरदेखील जारी करण्यात आला आहे.द इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, आज ( रविवारी) पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी काही नागरिकांनी अहसहकार आंदोलनाची घोषणा केली होती. त्यानुसार हे नागरिक या आंदोलनात सहभागी होण्यासाठी ढाक्यातील सायन्स लॅब चौकात दाखल झाले होते. मात्र, यावेळी त्यांना अवामी लीग, छात्र लीग आणि जुबो लीगच्या कार्यकर्त्यांनी जोरदार विरोध केला. त्यानंतर दोन्ही गटांमध्ये जोरदार हाणामारी सुरू झाली.याशिवाय काही आंदोलनकांनी ढाक्याच्या शाहबाग भागातील बंगबंधू शेख मुजीब वैद्यकीय महाविद्यालयासह या भागातील काही कार्यालय आणि आस्थापनांवरही हल्ले केले. विशेष म्हणजे काही आंदोलक लाठ्या-काठ्या घेऊन शाहबाग चौकात जमले, तेव्हा पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार संघर्ष झाला. यावेळी आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या.

### सरकारकडून हेल्पलाईन नंबर जारी

दरम्यान, या घटनेनंतर आता बांगलादेशच्या गृहमंत्रालयाने देशात अनिश्चित काळासाठी कर्फ्यूची घोषणा केली आहे. तसेच इंटरनेटदेखील बंद करण्यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे या घटनेनंतर भारत सरकारने बांगलादेशमधील भारतीयांना घराबाहेर न पडण्याच्या सुचना केल्या आहेत. तसेच भारतीय नागरिकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन नंबरदेखील जारी केला आहे. बांगलादेशमधील भारतीय नागरिकांना कोणतीही मदत हवी असल्यास +88-01313076402 या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन भारतीय दुतावासाकडून करण्यात आलं आहे.



# ॥ श्रावण मासी हर्ष मानसी ॥



**भा[illegible] 12 ज्योतिर्लिंग आहेत. त्यापैकी पाच ही महाराष्ट्रात आहेत. 1) घृष्णेश्वर, 2) भीमाशंकर, 3)परळी वैजनाथ, 4) त्र्यंबकेश्वर, 5) औढा नागनाथ. या वर्षी श्रावणात 5 सोमवार आहेत. महाईन्यूजच्या वतीने आम्ही दर सोमवारी 5 पैकी प्रत्येक ज्योतिर्लिंगाचे महात्म्य प्रसिद्ध करणार आहोत.**

वेरूळ गावातील येळगांगा नदीजवळ हे प्राचीन मंदिर असून मंदिराचं बांधकाम लालरांगाच्या दगडाने करण्यात आलेलं आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोबा आणि शहाजी राजे भोसले यांचे वडील मालोजीराव भोसले यांनी १६व्या शतकात मंदिराचा जीर्णोद्धार केला. या नंतर अहिल्याबाई होळकर यांनी १७९१ मध्ये परत एकदा या मंदिराचा जीर्णोद्धार केला होता

## मध्यरात्री १२ वाजता होणार पूजा

पूर्वी मंदिरामध्ये भाविकांकडून मोठ्या प्रमाणात अभिषेक होत होते. मात्र सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मंदिरामध्ये अभिषेक करण्यास बंधनं घालण्यात आली आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि लोकप्रतिनिधी यांच्या प्रमुख उपस्थितीत शासकीय पूजा महाशिवरात्रीच्या मध्यरात्री १२ वाजता संपन्न होणार आहे.

## मंदिराचा नेमका इतिहास काय आहे ?

या मंदिराचे बांधकाम लाल रंगांच्या दगडामध्ये करण्यात आले आहे. घृष्णेश्वर मंदिर हे एक प्राचीन शंकराचे मंदिर आहे.वेरूळपासून अवघ्या दीड किलोमीटरवर असलेले घृष्णेश्वर हे शंकर मंदिर भारतातील महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. तसेच बारा ज्योतिर्लिंगातील हे शेवटचे ज्योतिर्लिंग आहे. शिवपुराण, स्कंदपुराण, रामायण, महाभारत या ग्रंथांत या मंदिराचे उल्लेख दिसून येतात. वेरूळ गावातील येलगंगा नदीजवळ हे मंदिर असून छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचे आजोबा आणि शहाजीराजे भोसले यांचे वडील मालोजीराजे भोसले यांनी या मंदिराचा 16 व्या शतकात पहिल्यांदा जीर्णोद्धार केला होता. सध्याचे अस्तित्वात असलेले मंदिर इ.स. 1730 मध्ये मल्हारराव होळकरांच्या पत्नी गौतमीबाईंनी बांधलेले असून नंतर शिवभक्त अहिल्याबाई होळकरांनी या मंदिराचा परत एकदा जीर्णोद्धार केला. या मंदिराचे बांधकाम लाल रंगांच्या दगडामध्ये करण्यात आले आहे. या मंदिराचे नक्षीकाम अवर्णनीय आहे. या मंदिराला 27 सप्टेंबर 1960 रोजी राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले.

## मंदिराची वास्तुकला..

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरात पारंपारिक दक्षिण भारतीय वास्तू पाहता येते. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर परिसरात अंतर्गत कक्ष आणि गर्भगृह आहे. या मंदिराचे बांधकाम, 4400 चौरस फूट क्षेत्रावर पसरलेले आहे. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगमंदिर परिसरामध्ये पाच-स्तरीय उंच शिखर आणि अनेक खांब आहेत, जे पौराणिक गुंतागुंतीच्या कोरीव कामाच्या स्वरूपात बांधलेले आहेत. मंदिराच्या आवारात बांधलेल्या लाल दगडी भिंती मुख्यतः भगवान शिव आणि भगवान विष्णू यांचे दहा अवतार दर्शवितात. गर्भगृहात पूर्वेकडे शिवलिंग असून तेथे नंदीस्वरची मूर्तीही दिसते.



**औरंगाबाद : बारावं ज्योतिर्लिंग म्हणून जगभर प्रसिद्ध असलेलं औरंगाबाद जिल्ह्यातील घृष्णेश्वर मंदिर हे शेवटचं ज्योतिर्लिंग आहे. या नंतर ज्योतिर्लिंग कुठेही प्रकट झालं नसल्याने या ठिकाणाला पूर्णस्थान म्हणून धार्मिक मान्यता आहे. या ठिकाणी भाविकांनी मागितलेले प्रत्येक नवस, मागणं पूर्ण होत असल्याची अख्यायिका आहे. हे मंदिर पूर्वाभिमुख म्हणून परिचित आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील वेरूळलेणीच्या जवळच घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग आहे. हे एक प्राचीन महादेवाचं मंदिर आहे. या ठिकाणाचे उल्लेख रामायण, महाभारत, शिवपुराण, स्कंदपुराण या ग्रंथात आढळतात.**

## कथा काय आहे ?

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाची कहाणी पती-पत्नी जोडप्या सुधर्मा आणि सुधा यांच्या कथेपासून सुरू होते. दोघेही त्यांच्या वैवाहिक जीवनात आनंदी होते, परंतु ते बालसुखापासून वंचित होते आणि हे सिद्ध झाले की सुदेहा कधीही आई होऊ शकत नाही. म्हणून सुदेहाने तिचा पती सुधर्मा हिची धाकटी बहीण घुश्मासोबत लग्न केले. वेळ गेला आणि घुश्माच्या गर्विष्ठतेपासून, एक सुंदर मुलाचा जन्म झाला. पण हळू हळू तिच्या हातातून तिचा पती, प्रेम, घर आणि आदर जात असल्याचे पाहून सुधाच्या मनात ईर्षेची बीजं फुटू लागली आणि एके दिवशी संधी पाहून तिने मुलाची हत्या केली आणि त्याच तळ्यामध्ये त्याचे शरीर त्या तलावात दफन केले ज्यात घुश्मा शिवलिंगाचे विसर्जन करत होती. सुधर्माची दुसरी पत्नी घुश्मा, जी भगवान शिवची भक्त होती, ती दररोज सकाळी उठून 101 शिवलिंगे [illegible] करायची आणि नंतर तलावामध्ये विसर्जित करत असे. मुलाची बातमी ऐकून चहूबाजूंनी आक्रोश झाला, पण दररोज प्रमाणेच, घुश्माही शिवलिंग बनवून शांत मनाने भगवान शिवाची पूजा करत राहिली आणि जेव्हा ती तलावात शिवलिंगाचे विसर्जनकरायला गेली, तेव्हा तिचा मुलगा जिवंत बाहेर आला आला. त्याच वेळी भगवान शिव सुद्धा घुश्माला दिसले, भोलेनाथ सुधाच्या या कृतीवर रागावले आणि तिला शिक्षा आणि घुश्माला वरदान देऊ इच्छित होते. पण घुश्माने सुधेला क्षमा करावी अशी विनवणी केली आणि भगवान शंकराला लोकांच्या कल्याणासाठी येथे राहण्याची प्रार्थना केली. घुश्माची विनंती मान्य करून भोलेनाथ शिवलिंगाच्या रूपाने येथेच राहू लागले आणि हे स्थान जगभरात घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग म्हणून प्रसिद्ध झाले. घृष्णेश्वर मंदिराजवळ एक तलाव आहे. ज्याचं नाव शिवालय तलाव असे आहे.भाविक लोक घृष्णेश्वर मंदिरासोबत या तलावाला देखील मोठ्या भक्ती भावाने भेट देतात.

## कसे पोहचाल

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरास जाण्यासाठी उत्तम वेळ म्हणजे नोव्हेंबर ते फेब्रुवारी. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराला भेट देण्याचा हिवाळा हा सर्वोत्तम काळ आहे. तथापि आपण वर्षाच्या कोणत्याही वेळी येथे येऊ शकता. श्रावणाचा महिना भाविकांसाठी खास आहे. औरंगाबाद शहराचे विमानतळ घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरापासून 30 किलोमीटर अंतरावर आहे. बस किंवा टॅक्सीच्या साहाय्याने येथून तुम्ही सहजपणे घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर गाठाल. औरंगाबाद रेल्वे स्टेशन देशातील प्रमुख रेल्वे स्थानकांशी चांगले जोडलेले आहे. तुम्ही इथून बस किंवा टॅक्सीच्या मदतीने घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरापर्यंत सहज पोहोचू शकता, जे सुमारे 30 किलोमीटर अंतरावर आहे. औरंगाबाद बसस्टँड वरुन तुम्ही एलोरा लेण्यांसाठी बस पकडू शकता. घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर एलोरा लेण्यांपासून सुमारे 1-2 किमी अंतरावर आहे.

# श्रावणी सोमवारी का करतात उपवास?



श्रावण महिन्यात कुणी आठवड्यातल्या एखाद्या दिवशी उपवास करतात तर काही जणांचा संपूर्ण महिनाभर उपवास असतो... काही जण खास करून सोमवार पाळतात... पण, हा उपवास का पाळतात? या प्रश्नाचं उत्तर आज आपण जाणून घेणार आहोत... सोमवार हा शंकराचा वार म्हणून समजला जातो. मग, शंकराला खूश करण्यासाठी सोमवारच्या दिवशी अनेक महिला आणि अविवाहीत मुली उपवास करतात. देवांचा देव म्हणजे महादेव.... श्रावण महिन्यात संपूर्ण भारतात प्रत्येक मंदिरात घरात हर हर महादेव असे स्वर आपल्या कानावर पडतात. श्रावणातल्या प्रत्येक सोमवारी सर्व महादेव मंदिरात महादेवाचे पूजन एका विशिष्ठ पद्धतीने केले जाते. याचे कारण म्हणजे श्रावण महिन्यात शिव आणि पार्वती यांच्या पूजनाचे महत्त्व हिंदू ग्रंथांमध्ये खूप अधिक प्रमाणात वर्णन केले आहे. श्रावण महिन्यातील महादेवाच्या पूजेला खूप फलदायी मानले गेले आहे. याचे एक कारण म्हणजे श्रावण महिन्याला शंकराच्या उपासनेचा महिना असे सांगितले आहे. त्याआधी देवी सतीने शंकराला प्रत्येक जन्मात पती स्वरुपात मिळवण्याचा प्रण केला होता. देवी सतीने त्यांच्या दुसऱ्या जन्मात पार्वती असे नाव घेऊन राजा हिमाचल आणि राणी मैना यांच्या घरात मुलीच्या रुपात जन्म घेतला. पार्वतीने श्रावण महिन्यात निराहार राहून कठोर व्रत करून महादेवाला प्रसन्न केले व विवाह केला. त्यानंतर महादेवाला श्रावण महिना विशेष झाला.

# यंदा सोमवारपासून श्रावणाची सुरुवात

वर्ष १९५३ मध्ये शेवटच्या वेळी श्रावण महिन्याची सुरुवात सोमवारच्या दिवशी झाली होती. तब्बल ७१ वर्षांनंतर यंदा हा योग पुन्हा आला आहे. त्यासोबतच १८ वर्षांनंतर ५ श्रावणी सोमवार असलेला हा महिना असेल. ७१ वर्षांनंतर यंदा सोमवारपासून श्रावणाची सुरुवात; १८ वर्षांनंतर ५ श्रावणी सोमवार असलेला महिनावर्ष १९५३ मध्ये शेवटच्या वेळी श्रावण महिन्याची सुरुवात सोमवारच्या दिवशी झाली होती. तब्बल ७१ वर्षांनंतर यंदा हा योग पुन्हा आला आहे. त्यासोबतच १८ वर्षांनंतर ५ श्रावणी सोमवार असलेला हा महिना असेल.श्रावण महिना हिंदू धर्मात विशेष महत्त्वाचा मानला जातो. विशेषतः शिवभक्तांसाठी हा महिना अत्यंत श्रद्धेचा असतो. श्रावण सोमवारी भगवान शिवाची उपासना, उपवास आणि विविध धार्मिक अनुष्ठान आयोजित केली जातात. यंदा, तब्बल १८ वर्षांनंतर ५ श्रावणी सोमवार येत आहेत. त्यामुळे हा महिना शिवभक्तांसाठी विशेष ठरणार आहे.श्रावण सोमवारी मंदिरांमध्ये विशेष पूजेचे आयोजन केले जाते. भगवान शिवाचे दर्शन घेण्यासाठी आणि अभिषेक करण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने मंदिरात जातात.



फळाहार करणे आणि शिवलिंगावर जल अर्पण करणे याला विशेष महत्त्व दिले जाते. या पवित्र महिन्यात शिवभक्त विविध प्रकारे भगवान शिवाची आराधना करतात. गंगा जलाने अभिषेक, बेलपत्र अर्पण आणि रुद्राभिषेक ही काही प्रमुख पूजा पद्धती आहेत. श्रद्धाळू भक्तांच्या मते, या महिन्यात केलेली पूजा आणि व्रत विशेष फलदायी ठरतात.७१ वर्षांनंतर येणाऱ्या या योगामुळे श्रद्धाळू भक्तांमध्ये विशेष उत्साह आहे. विशेषतः, ५ श्रावणी सोमवार येण्याचा योग आणि सोमवारी श्रावणाची सुरुवात हा धार्मिक दृष्टिकोनातून एक महत्त्वाचा क्षण आहे.

# श्रीलंकेचा 32 धावांनी दणदणीत विजय!

## इंडियाच्या फलंदाजांचे जेफ्री व्हँडरसेसमोर सपशेल लोटांगण

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**भारत आणि श्रीलंका यांच्यातील वनडे मालिकेतील दुसरा सामना खूपच रोमांचक झाला, ज्यामुळे यजमान श्रीलंकेने पाहुण्या टीम इंडियाचा ३२ धावांनी दारुण पराभव केला. या सामन्यात भारताचे फलंदाज जेफ्री व्हँडरसेसमोर सपशेल लोटांगण घालताना दिसले. जेफ्री व्हँडरसेने ६ विकेट्स घेत श्रीलंकेच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाला २४१ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेला भारतीय संघ २०८ धावांत गारद झाला. ज्यामुळे श्रीलंकेच्या संघाला तब्बल ३ वर्षांनंतर भारताला वनडे सामन्यात पराभूत करण्यात यश आले आहे. त्याचबरोबर यजमान संघाने मालिकेत १-० शी आघाडी घेतली आहे.**




भारतासमोर २४१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या टीम इंडियाला रोहित शर्मा आणि शुबमन गिल यांनी चांगली सुरुवात करून दिली. दोघांमध्ये पहिल्या गड्यासाठी ९७ धावांची भागीदारी झाली. दरम्यान कर्णधार रोहितने २९ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. रोहितने आपल्या खेळीत ४४ चेंडूत ६४ धावा केल्या, त्यादरम्यान त्याने ५ चौकार आणि ४ षटकारही मारले. तर गिलने ३५ धावांचे योगदान दिले. त्यांच्या ९७ धावांच्या भागीदारीनंतर विकेट पडण्यास सुरुवात झाली. एकेकाळी भारतीय संघाने एकही विकेट न गमावता ९७ धावा केल्या होत्या, मात्र रोहित शर्माची विकेट पडल्यानंतर टीम इंडियाचे फलंदाज ठराविक अंतराने आऊट होत राहिले. गिलही कर्णधारानंतर लगेच तंबूत परतला. यानंतर शिव दुबे चार चेंडूंत एकही धाव न काढता पॅव्हेलियनमध्ये परतला. विराट कोहलीला ११ धावांच्या स्कोअरवर जीवदान मिळाले होत, पण तो केवळ ३ धावांनंतर म्हणजेच १४ धावा करून बाद झाला. श्रेयस अय्यर आणि केएल राहुल अनुक्रमे ७ धावा आणि शून्यावर बाद झाले. अशाप्रकारे एकही विकेट न गमावता भारताची धावसंख्या १ बाद ९७ धावांवरुन ६ बाद १४७ अशी झाली. अवघ्या ५० धावांच्या आत ६ विकेट्स गमावल्याने टीम इंडिया अडचणीत आली होती. यानंतर अक्षर पटेलने ४४ धावांची खेळी नक्कीच खेळली, पण तोही भारताचा पराभव जास्त काळ टाळू शकला नाही. अशा प्रकारे टीम इंडियाचा डाव ४२.२ षटकांत २०८ धावांवर गारद झाला. श्रीलंकेकडून जेफ्री व्हँडरसेने ६ आणि चरित असलंकाने ३ विकेट्स घेतल्या. तत्पूर्वी श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, मोहम्मद सिराजने पहिल्याच चेंडूवर पथुम निसांकाला बाद करून भारताला भारताला चांगली सुरुवात करुन दिली. मात्र, अविष्का फर्नांडो (४०) आणि कुसल मेंडिस (३०) श्रीलंकेचा डाव सावरला. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ७४ धावांची भागीदारी केली. मात्र, मधल्या षटकांमध्ये विकेट घेण्यात भारतीय गोलंदाजांना यश आले. शेवटी दुनिथ वेल्लालगे (३९) आणि कामिंडू मेंडिस (४०) यांनी चांगली खेळी खेळून श्रीलंकेला आव्हानात्मक धावसंख्येपर्यंत नेले. ज्यामुळे श्रीलंकेने ५० षटकांत नऊ गडी गमावून २४० धावा केल्या. भारतातर्फे वॉशिंग्टन सुंदरने १० षटकांत ३० धावांत सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या, तर कुलदीप यादवने २ विकेट्स घेतल्या.

### इंडियाचा 32 धावांनी पराभव

तर मोहम्मद सिराज आणि अक्षर पटेल यांना प्रत्येकी एक विकेट्स मिळाली.भारत आणि श्रीलंका यांच्यातील वनडे मालिकेतील दुसरा सामना खूपच रोमांचक झाला, ज्यामुळे यजमान श्रीलंकेने पाहुण्या टीम इंडियाचा ३२ धावांनी दारुण पराभव केला. या सामन्यात भारताचे फलंदाज जेफ्री व्हँडरसेसमोर सपशेल लोटांगण घालताना दिसले. जेफ्री व्हँडरसेने ६ विकेट्स घेत श्रीलंकेच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. या सामन्यात श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाला २४१ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेला भारतीय संघ २०८ धावांत गारद झाला. ज्यामुळे श्रीलंकेच्या संघाला तब्बल ३ वर्षांनंतर भारताला वनडे सामन्यात पराभूत करण्यात यश आले आहे. त्याचबरोबर यजमान संघाने मालिकेत १-० शी आघाडी घेतली आहे.भारतासमोर २४१ धावांचे लक्ष्य ठेवले होते.

# जोकोव्हिचची सुवर्णपदकाला गवसणी

## अल्काराजचा पराभव करत घडवला इतिहास

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**अनुभवी टेनिसपटू नोव्हाक जोकोव्हिचचे (NOVAK DJOKOVIC) अधुरे स्वप्न पूर्ण झाले आहे. त्याने कारकिर्दीत प्रथमच सर्वात मोठी स्पर्धा ऑलिम्पिकचे सुवर्णपदक जिंकले आहे. जोकोव्हिचने रविवारी पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत कार्लोस अल्काराझचा पराभव करून इतिहास रचला. ३७ वर्षीय सर्बियन खेळाडूने अल्काराजचा ७-६(३), ७-६(२) असा पराभव केला. १९८८ नंतर ऑलिम्पिक टेनिस स्पर्धेत सुवर्ण जिंकणारा जोकोव्हिच हा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला आहे.**



२४ ग्रँडस्लॅम जेतेपदे पटकावणाऱ्या जोकोव्हिचला ऑलिम्पिक पदकाची खूप दिवसांपासून आतुरता होती. त्याने इटलीच्या लोरेन्झो मुसेट्टीचा पराभव करून आपल्या पहिल्या ऑलिम्पिक फायनलमध्ये प्रवेश केला. अव्वल मानांकित जोकोव्हिचने मागील तीन ऑलिम्पिक उपांत्य फेरीत पराभव पत्करले होते. जोकोव्हिचने विम्बल्डनमध्ये अल्काराझकडूनही बदला घेतला आहे. विम्बल्डन विजेतेपदाचा सामनाही जोकोव्हिच आणि अल्काराज यांच्यात झाला, ज्यामध्ये सर्बियन खेळाडूला पराभवाचा सामना करावा लागला होता.या विजयासह नोव्हाक जोकोव्हिच हा चारही ग्रँडस्लॅम विजेतेपदे जिंकणारा जगातील पाचवा खेळाडू ठरला असून त्याच्या नावावर ऑलिम्पिक सुवर्णही (PARIS OLYMPICS 2024) आहे. जोकोव्हिचच्या आधी केवळ स्टेफी ग्राफ, आंद्रे अगासी, राफेल नदाल, सेरेना विल्यम्स यांनाच ही कामगिरी करता आली. चारही ग्रँडस्लॅम आणि ऑलिम्पिक सुवर्ण जिंकण्याच्या कामगिरीला करिअर गोल्डन स्लॅम म्हणतात.

### गोल्डन स्लॅम म्हणजे काय?

२४ ग्रँडस्लॅम जेतेपदे पटकावणाऱ्या जोकोव्हिचला ऑलिम्पिक पदकाची खूप दिवसांपासून आतुरता होती. त्याने इटलीच्या लोरेन्झो मुसेट्टीचा पराभव करून आपल्या पहिल्या ऑलिम्पिक फायनलमध्ये प्रवेश केला. अव्वल मानांकित जोकोव्हिचने मागील तीन ऑलिम्पिक उपांत्य फेरीत पराभव पत्करले होते. जोकोव्हिचने विम्बल्डनमध्ये अल्काराझकडूनही बदला घेतला आहे. विम्बल्डन विजेतेपदाचा सामनाही जोकोव्हिच आणि अल्काराज यांच्यात झाला, ज्यामध्ये सर्बियन खेळाडूला पराभवाचा सामना करावा लागला होता.या विजयासह नोव्हाक जोकोव्हिच हा चारही ग्रँडस्लॅम विजेतेपदे जिंकणारा जगातील पाचवा खेळाडू ठरला असून त्याच्या नावावर ऑलिम्पिक सुवर्णही (PARIS OLYMPICS 2024) आहे. जोकोव्हिचच्या आधी केवळ स्टेफी ग्राफ, आंद्रे अगासी, राफेल नदाल, सेरेना विल्यम्स यांनाच ही कामगिरी करता आली. आता या चार खेळाडूंसह नोव्हाकचे नाव आता ग्रँडस्लॅम विजेत्यांच्या यादीत आले आहे.